# संशोधन संचालनालय
# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

5502

जा. क्र. डीओआर/जीआरपी/ /२०१७
दिनांक : २२/११/२०१७ 23

## परिपत्रक

विषय : संशोधन संचालनालयाकडे प्राप्त होणा-या प्रस्तावांबाबत...

संशोधन संचालनालयातंर्गत कार्यरत संशोधन योजनांकडुन विविध प्रकारचे प्रस्ताव जसे खरेदी, मजुर पुरवठा, प्रक्षेत्रावरील शेती विषयक कामे इत्यादि संशोधन संचालनालयाकडे प्राप्त होत असतात. सदरील प्रस्तावाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले आहे की, बहुतांशी योजनांचे प्रस्ताव हे प्रशासकीय दृष्टया परिपुर्ण नसतात. परिणामी सदरील प्रस्ताव त्यामध्ये असलेल्या त्रुटींची पुर्तता करण्यासाठी संबंधीत योजनाकडे परत केले जातात. यामध्ये कालापव्यय होऊन संबंधीत योजनेच्या कामामध्ये विलंब होण्याची शक्यता निर्माण होते.

**करीता, सदरील प्रस्तावाचा निपटारा जलद गतीने व सुलभपणे होण्यासाठी संशोधन संचालनालय खालील प्रमाणे सुचना देत आहे.**

१. प्रत्येक प्रस्तावाच्या नस्तीचे टिपणी विभाग व पत्र व्यवहार असे दोन भाग केले जावे. टिपणी विभाग जिथे संपेल तिथे विभाजक लावण्यात यावे.

२. नस्तीस पृष्ठ क्रमाक दिले जावेत जसे टिपणी विभागास टि-१, टि-२ व पत्र व्यवहार विभागास प-१, प-२.

३. **प्रत्येक प्रस्ताव हा विद्यापीठ सारसंग्रह २०१७ मधील तरतुदींनुसारच सादर करण्यात यावा.**

४. खरेदीसाठीचे प्रस्ताव हे शासन निर्णय दिनांक १/१२/२०१६ मधील तरतुदीनुसारच सादर केले जावेत.

५. **कुठलाही प्रस्ताव हा सुरुवातीस प्रशासकीय मान्यता घेऊनच मंजुरीसाठी सादर करावा. इतःपर कुठल्याही प्रस्तावास कार्योत्तर मान्यता दिली जाणार नाही.**

६. मजुर पुरवठयासाठीचे प्रस्ताव हे विविध विद्यापीठ परिपत्रके जसे, विद्यापीठ परिपत्रक दिनांक १३/०६/२०१७, विद्यापीठ परिपत्रक दिनांक ०४/०९/२०१७ व विद्यापीठ परिपत्रक दिनांक १५/११/२०१७, यामधील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करुनच मंजुरीसाठी सादर करण्यात यावे.

७. **प्रस्तावासंबंधी अथवा प्रस्तावाच्या हालचाली (Movement) बद्दल कुठलीही चौकशी करावयाची झाल्यास संबंधीत योजनेच्या जबाबदार कर्मचा-याने/अधिका-यानेच या कार्यालयाशी संपर्क साधावा. कंत्राटदारास या कार्यालयाशी संपर्क करण्याविषयी सुचीत करण्यात येऊ नये.**

८. प्रत्येक प्रस्तावाच्या मंजुरीसाठी साधारणतः एक आठवडा एवढा कालावधी अपेक्षित आहे. या कालावधीच्या अगोदर शक्यतो प्रस्तावाविषयी विचारणा करण्यात येऊ नये.

९. अधिका-यांने/कर्मचा-यांने एका संपूर्ण महिन्याचीच दौरा दैनंदिनी सादर करावी. एका दौ-याची अथवा दोन दौ-यांची दैनंदिनी सादर करु नये.

१०. वर उल्लेखीत शासन निर्णय व विद्यापीठ परिपत्रके संशोधन संचालनालय येथे उपलब्ध आहेत.

सदरील परिपत्रक हे विद्यापीठ संकेतस्थळ vnmkv.ac.in वर उपलब्ध आहे.

संचालक संशोधन
वनामकृवि, परभणी